विशेष लेख क्र. १५ ०६ फाल्गुन १९२६ (सायं.५.३० वा.)
शनिवार, दि. २६ फेब्रुवारी, २००५

# कै.वि.स.पागे : एक कृतीशील ज्ञानवंत

**राज्यात अत्यंत क्रांतीकारी ठरलेल्या रोजगार हमी योजनेचे जनक व महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती कै.वि.स.पागे यांच्या स्मृतीदिनानिमित्त दिनांक १ मार्च २००५ रोजी मुंबई येथे विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात सकाळी १० वाजता रोजगार हमी योजनेची फलश्रुती या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. कै.वि.स.पागे यांच्या असामान्य कार्याची ओळख करुन देणारा हा विशेष लेख.......**

विकास करावयास असेल, येथील आर्थिक जीवन संपन्न करावयाचे असेल, तर ज्याप्रमाणे काही जीवं त पाण्याचे झरे असल्याशिवाय नदी वाहू शकत नाही, त्याचप्रमाणे जेथे जिव्हाळ्याच्या ज्या काही शक्ती असतील, त्या मोकळ्या केल्या पाहिजेत. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै.यशवंतराव चव्हाण यांनी लोकशाहीच्या माध्यमातून विकास ही संकल्पना स्पष्ट करताना केलेले वरील विवेचन राजकारण व समाजकारणात सक्रिय असणाऱ्यांसाठी आजही अत्यंत दिशादर्शक ठरणारे आहे. लोकशाहीमध्ये जनताजनार्दन मतपेटीच्या माध्यमातून आपले राज्यकर्ते निवडत असतो. असे राज्यकर्ते संख्येने अत्यंत मूठभर असले तरी जनताजनार्दनाच्या शुभेच्छा आणि सद्‌भावनांच्या आधारावर त्यांची सत्ता अबाधित असते. त्यामुळे विकासाच्या संकल्पनेला मूर्त रुप देताना समाजातील सर्वात शेवटचा, उपेक्षित घटक कधीही नजरेआड होता कामा नये. इतकेच नव्हे तर अशा "नाही-रे" वर्गाच्या समस्यांची सोडवणूक करताना ती केवळ यंत्रवत भावनेने न केली जाता अंत:करणपूर्वक, जिव्हाळयाच्या सर्व शक्ती मोकळया करुन व्हावी, हा संस्कार महाराष्ट्राच्या मातीत द्रष्टया समाजधुरिणांनी रुजविला असल्यामुळे महाराष्ट्र हे देशात एक आघाडीचे राज्य म्हणून नावारुपाला येवू शकले. गोरगरीब, अकुशल श्रमशक्तीला विकासाच्या कार्याकडे वळवून दुसरीकडे त्यांना रोजगाराची हमी देणारी, त्यांचा जीवनस्तर उंचावणारी महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना आज केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील गोरगरीबांच्या इच्छा आकाक्षांची प्रतीक बनली आहे. कृतीशील ज्ञानवंत, १९६० ते १९७८ अशी सलग १८ वर्षे महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापतीपद भुषविणारे ज्येष्ठ गांधीवादी नेते आणि संसदीय लोकशाही प्रणालीचे साक्षेपी भाष्यकार कै. विठ्ठल सखाराम तथा वि. स. पागे हे या योजनेचे जनक होत.

संसदेचे अर्थसंल्पीय अधिवेशन सध्या सुरु असून डिसेंबर,२००४ मध्ये सादर झालेले "राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयक " त्यात चर्चेसाठी येणार आहे. कें दीय ग्रामविकास मंत्रालयाने हे विधेयक सादर केले असून श्रीमती सूर्यकांता पाटील या महाराष्ट्रातील महिला नेत्या या खात्याच्या राज्यमंत्री आहेत. संसदेपुढे सादर झालेले हे विधेयक महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेवर आधारित असून महाराष्ट्राच्यादृष्टीने ही अत्यंत गौरवास्पद अशी घटना आहे. कै. वि. स. पागे यांचा १५ वा स्मृतीदिन दि.१६ मार्च, २००५ रोजी येत आहे. हे औचित्य साधून विधान परिषदेचे सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांच्या संकल्पनेनुसार आणि विधान सभेचे अध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ मार्च, २००५ रोजी महाराष्ट्र विधानमंड ळ सचिवालय व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे कै. वि. स. पागे यांचा स्मृतीदिन अत्यंत कल्पकपणे साजरा केला जात आहे. कै.वि.स.पागे यांनी वेळोवेळी दिलेली भाषणे, पीठासन अधिकारी पदावरुन दिलेले निर्णय, दारिद्रयनिर्मुलना संदर्भात व्यक्त केले. मुलगामी विचार, रोजगार हमी योजनेची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे विश्लेषण आदींचे संकलन असलेला ग्रंथ मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या शुभहस्ते प्रकाशित केला

जात आहे. मा.उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील, मा. विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी, श्री. नारायण राणे यांची यावेळी सन्माननीय उपस्थिती लाभणार आहे. या ग्रंथ प्रकाशन सोहळयाला जोडूनच "रोजगार हमी योजनेची फलश्रृती" या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून त्यात रो. ह.यो. व संसदीय कार्यमंत्री हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री प्रा. एन.डी. पाटील , विधान परिषद सदस्य उल्हासदादा पवार, माजी उप मुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे व माजी मंत्री, विधान परिषद सदस्य दिवाकर रावते आपले विचार मांडणार आहेत. सकाळी १० ते १ या वेळेत विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. नव्या पिढीपुढे कै. वि.स. पागे यांच्या विचारांचा समृध्द वारसा ग्रंथ व परिसंवादातील विचार मंथनाच्या माध्यमातून ठेवला जाणार आहे.

**महाराष्ट्राचा वैशिष्टयपूर्ण वारसा**

संसदीय प्रथा, परंपरा आणि संकेत यादृष्टीने महाराष्ट्राने आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविलेला आहे. विधान सभेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब भारदे आणि विधान परिषदेचे माजी सभापती कै. वि. स.पागे या कीर्तन परंपरेतील पीठासीन अधिका-यांच्या जोडीचे योगदान यादृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण ठरले आहे.

विधान परिषद या वरिष्ठ सभागृहाने विविध प्रश्न तसेच विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण मूलगामी व सर्व समावेशक चर्चेद्वारे, सरकारला केलेल्या उपयुक्त सूचनांद्वारे आपली उपयुक्तता सिद्ध केलेली आहे. कै .वि.स.पागे यांची या संदर्भातील भूमिका निश्चितच महत्वाची आहे. योजनाबद्ध विकासाची आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारल्याकारणाने स्वातंत्र्यानंतर शासनाच्या कार्यात बेसुमार वाढ झालेली आहे. शासनाच्या कार्यामध्ये आता नागरिकांच्या जीवनाच्या आणि कामकाजाच्या अधिकाधिक बाबींचा समावेश झालेला आहे. एखादी विंधन विहिर खोदण्यापासून ते मोठ्या धरणाच्या बांधकामापर्यंत शासनाचा या ना त्या प्रकारे संबंध येतच असतो. कदाचित कोणी असे देखील म्हणेल की, शासनाच्या काही निर्देशांमुळे नागरिकांचा परिणामकारक प्रभाव हळूहळू कमी होत चाललेला आहे. अशा परिस्थितीत वरिष्ठ सभागृह हे नागरिकांच्या स्वातंत्र्याचा रक्षक म्हणून यशस्वीपणे कार्य करु शकले. हे कै.वि.स.पागे यांनी महाराष्ट्रातील विधान परिषदेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित समारंभात १९८७ साली मांडलेले विचार त्यांची या संदर्भातील मार्मिक दृष्टी व अपेक्षा स्पष्ट करतात. विधान परिषदेमध्ये आणखी कोणकोणत्या वर्गाला प्रतिनिधीत्व देता येईल, जेणेकरुन कायदा व निर्णय प्रक्रियेत सर्व समाज घटकांचा सहभाग राहील यादृष्टीने कै. वि.स.पागे यांनी सातत्याने चिंतन व मनन केले. त्याचप्रमाणे या माध्यमातून लोकशाहीची सर्व समावेशकता वाढावी यादृष्टीने काही उपायही सुचविले. प्राध्यापक, शिक्षकांना व पदवीधरांना विधान परिषद या सभागृहात प्रतिनिधत्व दिलेले आहे. परंतु त्याचप्रमाणे सेवानिवृत्त न्यायाधिश, कायदेतज्ञ, मोठया संख्येने असलेले प्राथमिक शिक्षक, कामगार, वाणिज्य उद्योग क्षेत्र, सहकार चळवळी अंतर्गत ग्राहक सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्था, औद्योगिक सहकारी संस्था, शेतकरी-शेतमजूर, ग्रामीण कारागीर, सनदी लेखापालांची संस्था, ओद्योगिक सहकरी संस्था, वैद्यक व वकिल व्यावसायिकांच्या संघटना आदी घटकांनाही विधानपरिषदेत प्रतिनिधीत्व मिळायला हवे असा कै.वि.स.पागे यांचा आग्रह होता. विधान परिषदेच्या रचनेत अशाप्रकारे फेरबदल करावा व हे फेरबदल केल्याने संविधानात कोणतेही बदल करण्याची गरज भासणार नाही. केवळ १९५० च्या लोकप्रतिनिधीत्व अधिनियमाच्या संबंधित कलमात सुधारणा करुन हे फेरबदल करता येतील असेही त्यानी सुचविले आहे.

**रोजगार हमी योजना**

बेरोजगार हाताना काम, दारिद्रयनिर्मुलन आणि स्वावलंबनातून विकास याबाबत कै .वि.स.पागे यांनी अत्यंत मूलगामी असे चिंतन केले. ''आपल्या आजवरच्या नियोजनात बेकारीचे निर्मुलन हे कधीच प्रमुख उद्दिष्ट

नव्हते. त्यास कायम दुय्यम दर्जाचे स्थान दिले गेले. यापुढे मात्र आपण सर्वांना रोजगार उपलबध करुन देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने पावले उचलली पाहिजेत. सर्वांना काम हेच यापुढे आपले ब्रीद असले पाहिजे. केवळ मूठभर लोकांचा विकास होण्याच्या प्रक्रियेत बहुजन समाजाचा हळूहळू बळी जात असलेला सहन करणे हे अत्यंत अमानुष आहे. म्हणूनच हे ध्येय आपण अंत:करणापासून स्वीकारले पाहिजे, असा माझा आग्रह आहे. रोजगार हमी योजनेमागे हीच विचारप्रणाली आहे''. इतक्या सुस्पष्टपणे त्यांनी आपली भूमिका मांडली होती.

स्वतः हातात अन्नाचा घास घेताना माझ्या उपेक्षित, पीडित, जगण्याचे कोणतेही साधन नसलेल्या बांधवांच्या पोटासाठी मी काय करु शकेन, असा सातत्याने विचार व चिंतन करुन कै. वि.स .पागे यांनी अत्यंत अभ्यासाने आणि चिकाटीने रोजगार हमीची योजना आखली. या योजनेचा महाराष्ट्रातील लक्षावधी गरीब कुटुंबांना रोजगार प्राप्तीसाठी फायदा झाला. काळाच्या ओघात या योजनेत काही गैरप्रकार, अपप्रवृत्तीही शिरल्या असतील, परंतु योजनेचे मूळ स्वरुप व त्यामागील गोरगरिबांच्या कल्याणाचा विचार आत्यंतिक महत्वाचा आहे. सर्वांना काम मिळो, दाम मिळो आणि आपला भारत समृद्ध होवो ही कै. वि.स.पागे यांची भूमिका ज्ञानदेवांनी **पसायदानात** मांडलेल्या भूमिकेपेक्षा वेगळी नाही. कै.वि.स.पागे यांना कृतीशील विचारवंत म्हटले जाते ते याचमुळे.

लोकशाही व्यवस्था खऱ्या अर्थाने दृढमूल व समृद्ध व्हायची असेल तर विकासाची फळे समाजाच्या सर्वात खालच्या, टोकाच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजेत. लोकशाहीत मुठभरांची सत्ता बहुजनांच्या सदिच्छांच्या आधारावर अवलंबून असते. मतपेटी हे या अधिमान्यतेचे महत्वाचे माध्यम आहे. परंतु मोठ्या संख्येने असलेल्या उपेक्षित वर्गाला आपल्या इच्छाआकांक्षाचे प्रतिबिंब राज्यव्यवस्थेत आढळले नाहीत तर अराजकसदृष्य परिस्थिती निर्माण होवून लोकशाही संकटात आल्याची अनेक उदाहरणे आपण बघितली आहेत. या पार्श्वभूमीवर संसदीय लोकशाहीची पताका उंच फडकावित ठेवणाऱ्या आणि आपल्या बहुआयामी प्रतिभेने दारिद्रयनिर्मुलनाच्या क्षेत्रात अलौकिक कार्य करणाऱ्या कै. वि.स.पागे यांचे कार्य खरोखरच अविस्मरणीय असे आहे.

कै. वि.स.पागे यांच्या निधनानंतर तत्कालिन अर्थ व नियोजन मंत्री बॅ.रामराव आदिक यांनी विधान परिषदेत शोक प्रस्ताव मांडला. शोकप्रस्तावावर बोलताना तत्कालिन सदस्य व माजी सभापती प्रा .ना.स. फरांदे यांनी अत्यंत भावस्पर्शी शब्दात कै. पागेच्या व्यक्तिमत्वाचे पैलू उलगडून दाखविले. ज्ञानेश्वरांची जी परंपरा आपल्याकडे सुरु झाली त्यांच्या माळेतील हा शेवटचा मणी होता. कै. पागे यांच्या जाण्यामुळे राजकारणातील कार्यकर्त्यांना, श्रमिकांना, सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांना दु:ख तर होईलच, पण त्याचबरोबर महाराष्ट्रातील संत मालिकेतील आळंदीला समाधीन अवस्थेतील ज्ञानेश्वर देखिल सद्‌गदित झाले असतील. देहूच्या वाड्यातील समाधीमध्ये तुकाराम महाराजांनी देखिल हुंदका दिला असेल. अशा या लोकोत्तर पुरुषाच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

**-- निलेश मदाने**
जनसंपर्क अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

---------------

चव्हाण/ २६ फेब्रु. २००५